# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com

## शिक्षण शुल्क समितीच्या दि.२०-०७-२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

सन २०२१-२२ करिता शुल्क निश्चितीबाबत तसेच इतर विषयांबाबत शिक्षण शुल्क समितीची बैठक **दि.२०-०७-२०२३ रोजी स.११:०० वाजता** मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्या दालनात पार पडली. शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | **अध्यक्ष** |
| २ | मा.श्रीमती गौरी जाधव, अवर सचिव, वित्त विभाग (मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | **सदस्य** |
| ३ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | **सदस्य सचिव** |
| ४ | डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन, पुणे (ऑनलाईन उपस्थिती) | **सदस्य** |
| ५ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे (ऑनलाईन उपस्थिती) | **सदस्य** |
| ६ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | **सदस्य** |

श्री. धनाजी वासके, विशेष निमंत्रित-खर्च लेखापाल, श्री. चंदन श्रीहरी पाटील, संस्था प्रतिनिधी,म.फुले ग्रामिण विकास सेवाभावी संस्था, जळकोट, लातूर-निमंत्रित सदस्य हे बैठकीस

उपस्थित होते. श्री.मनोज चांडक, विशेष निमंत्रित-सनदी लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे हे ऑनलाईन पध्दतीने सदर बैठकीस उपस्थित होते.

डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई-सदस्य, श्री.व्ही.बी. शर्मा, सनदी लेखापाल-सदस्य, विशेष निमंत्रित म्हणून श्री. सुनिल सोनवणे, शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ, तथा प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई, डॉ.राजेंद्र ढाकणे, शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ तथा सह.प्राध्यापक, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई, यांनी बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत कळविले आहे.

सदर बैठकीच्या सुरूवातीस सदस्य तथा सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. त्यानंतर शिक्षण शुल्क समितीच्या दि.११.०४.२०२३ च्या बैठकीच्या इतिवृत्तावर झालेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.११.०४.२०२३ च्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत आढावा.**

:- सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई समितीच्या दि.११.०४.२०२३ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यपूर्तिबाबतचा अहवाल समितीस सादर केला.

**विषय क्र.०२, ०३, ०४ व ०५:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शेवटच्या संधीमध्ये विलंब शुल्कासह प्राप्त झालेल्या शै. वर्ष २०२१-२२ करिताच्या तसेच अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या, खर्चात वाढ झालेल्या, एन.सी.टी.ई. सुधारित क्षमतेनूसार प्राप्त एकुण २३ महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

:-राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शेवटच्या संधीमध्ये विलंब शुल्कासह प्राप्त झालेल्या शै. वर्ष २०२१-२२ करिता बी.एड- ०९, एम.एड-१,बी.पी.एड-०२, बी.एस्सी.बी.एड-०१,बी.एड-एम.एड- ०१ अशा एकूण १४, एन.सी.टी.ई.च्या सुधारित प्रवेश क्षमतेनूसार प्राप्त शुल्क फेरनिश्चितीकरिता १, खर्चात वाढ झालेल्या महाविद्यालयाकडून शुल्क फेरनिश्चीतीकरिता १ तसेच अल्पसंख्यांक महाविद्यालयांकडून शुल्क पडताळणीकरिता करिता ७ अभिलेख/प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावांची खर्च लेखापाल तसेच विषयांचे तज्ज्ञ यांनी तपासणी करून त्रुटी उपरोक्त महाविद्यालयांना कळविण्यात आलेल्या होत्या तथापि, बऱ्याच महाविद्यालयांनी त्रुटींची पूर्तता केलेली नाही. तसेच काही महाविद्यालयांनी वेतन हे पूर्ण किंवा अंशत: रोख स्वरूपात दिलेले आहे. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.१ Salary of Employees(Teaching &Non-teaching)is to be paid through Bank Accounts only. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक होते, तथापि, महाविद्यालयांनी याचे पालन केलेले नाही. सबब लेखापरिक्षणात दर्शविलेला खर्च वेतनावर झाला आहे किंवा कसे, याची पडताळणी

समितीस करता आलेली नाही. केवळ बँकेमार्फत दिलेल्या वेतनाच्या आधारे शुल्काची पडताळणी/परिगणना करून शुल्क निश्चिती का करण्यात येऊ  नये याबाबत खुलासा मागवून महाविद्यालयांना तसे कळवून बँकेमार्फत व रोख स्वरूपात अदा केलेल्या वेतनाबाबत तपशील व खुलासा ७ दिवसांच्या आत मागवून घ्यावा. खुलासा प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त महाविद्यालयांचे प्रस्ताव समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावेत, असा निर्णय झाला.

| | |
|---|---|
| **परिशिष्ट अ -बी.एड-** | ०९ |
| **परिशिष्ट ब-एम.एड-** | ०१ |
| **परिशिष्ट क-बी.पी.एड-** | ०२ |
| **परिशिष्ट ड-बी.एस्सी.बी.एड-** | ०१ |
| **परिशिष्ट इ -बी.एड- एम.एड-** | ०१ |
| **परिशिष्ट अ१-बी.एड-** | ०१ |
| **परिशिष्ट-अ२-बी.एड** | ०१ |
| **परिशिष्ट अ३ -बी.एडअल्पसंख्यांक** | ०७ |

**विषय क्र.६:-शिक्षण शुल्क समितीचे सदस्य तसेच विशेष निमंत्रित यांनी सूचविलेल्या सुधारणा/अभिप्राय नूसार  शिक्षण शुल्क समितीची सुधारित नियमावली व नमुना अर्ज अंतिम करणेबाबत.**

दि.११.०४.२०२३ च्या बैठकीच्या इतिवृत्तानूसार समितीच्या नियमावलीची soft copy समितीचे सर्व सदस्य, विशेष निमंत्रित यांना circulate  करून त्यावर सूचना/सुधारणा/बदल मागविण्यात आले. प्राप्त झालेल्या सूचनांनूसार समितीच्या नियमावलीत बदल करण्यात आला आहे. अंतिम नियमावली राज्यातील सर्व महाविद्यालयांना पाठवून त्यावर सुधारणा, सूचना, हरकती मागविण्यात याव्यात, सदर सुधारणा,सूचना व हरकती समितीच्या पुढील बैठकीत ठेवून त्यावर चर्चा करून समितीची नियमावली व नमुना अर्ज अंतिम करण्यात येईल, असा निर्णय झाला.

**विषय क्र.७:-महाविद्यालयांच्या विकास शुल्कास मान्यता देणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीची दि.०५.०१.२०२२ व दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील निर्णयानूसार महाविद्यालयांकडून विकास खाते व विकास योजना मागविण्यात होत्या. समितीच्या दि.११.०४.२०२३ च्या बैठकीनंतर उर्वरित महाविद्यालयांपैकी एकूण ८ महाविद्यालयांकडून उपरोक्त अभिलेख प्राप्त झालेले आहेत. तरी या महाविद्यालयांना सन २०२२-२३ पासून १० टक्के विकास शुल्क लागू करणेबाबत, समितीच्या विचारार्थ सादर.

**परिशिष्ट अ४ - ८ महाविद्यालये**

पुढील वेळेस प्रस्ताव सादर करताना उपरोक्त महाविद्यालयांना शैक्षणिक वर्षात विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा विकास शुल्काचा स्वतंत्र ताळमेळ (हिशोब) सादर करणे

बंधनकारक राहील, असा निर्णय झाला. उर्वरित महाविद्यालयांनी परस्पर विकास शुल्क आकारू नये,असा निर्णय झाला.

**विषय क्र.८:-अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

८.१ नंदुरबार तालुका विधायक समितीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय (**बी.एड**), नंदुरबार, जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन(**बी.पी.एड**) पुसद, जि.यवतमाळ व श्री. स्वामी समर्थ शारिरीक शिक्षण महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावती ही महाविद्यालये मागील ५-७ वर्षापासून प्रवेश नसणे/शिष्यवृत्ती समस्या/प्राचार्यांचा अपघात इ. कारणास्तव बंद होती. सदर महाविद्यालयांनी सन २०२३-२४ पासून महाविद्यालय पुन्हा सुरू करणेबाबत कळविले आहे. महाविद्यालयांच्या विनंतीनूसार अशा महाविद्यालयांना सन २०२३-२४ करिता महाडीबीटी पोर्टलवर शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार शिक्षणशास्त्र(बी.एड) अभ्यासक्रमासाठी रू.१३९००/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क आणि शारीरिक शिक्षणशास्त्र (बी.पी.एड.) अभ्यासक्रमासाठी शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार निश्चित करून दिलेले रू.३,०००/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क अंतरिम शुल्क म्हणून मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. लेखापरिक्षण अहवाल तयार झाल्यानंतर उपरोक्त महाविद्यालयाने शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील.

८.२ जनता शिक्षण प्रसारक समितीचे पंडित राजपती मिश्रा कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, ठाणे या अल्पसंख्यांक महाविद्यालयातील **एम.एड** अभ्यासक्रमाकरिता एन.सी.टी.ई. ने मान्यता काढून घेतल्यामुळे सदर अभ्यासक्रम २०१७ पासून बंद होता तथापि सदर महाविद्यालयास एन.सी.टी.ई. कडून सन २०२२-२३ करिता Restoration order मिळाली महाविद्यालयाने केलेल्या विनंतीनूसार २०२३-२४ करिता महाडीबीटी पोर्टलवर शासकीय महाविद्यालयातील विनाअनुदानित एम.एड अभ्यासक्रमासाठी निश्चित करून दिलेले रू.२०,०००/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क अंतरिम शुल्क म्हणून मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. लेखापरिक्षण अहवाल तयार झाल्यानंतर उपरोक्त महाविद्यालयाने शुल्क पडताळणीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील.

८.३ स्व. माधवराव तिडके शारीरिक शिक्षण महाविद्यालय, मावदा, नागपूर या महाविद्यालयास सन २०२२-२३ला एन.सी.टी.ई. ची मान्यता मिळाली असून सदर महाविद्यालय सन २०२२-२३ करिता शुल्क निश्चिती करिता प्रस्ताव सादर करणार असल्याचे कळविले आहे. प्रस्ताव सादर केल्यानंतर नवीन शुल्क मंजूरी मिळेपर्यंत सन २०२३-२४ करिता शारीरिक शिक्षणशास्त्र (बी.पी.एड.) अभ्यासक्रमासाठी शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार निश्चित करून दिलेले रू.३,०००/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क अंतरिम शुल्क म्हणून मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई